# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:12.04.2025** **वार:शनिवार**

1. अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत महाराष्ट्रातील 132 रेल्वे स्थानकांचा कायापालट करणार असल्याची रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची माहिती
2. वेव्हज् परिषदेत जगभरातल्या 100 पेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी सहभागी होणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आणि
4. क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरातून अभिवादन

**रेल्वे-वैष्णव**

भारतीय रेल्वेच्या 'अमृत भारत स्टेशन' योजनेमध्ये महाराष्ट्रातील एकंदर 132 रेल्वे स्थानकांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेद्वारे देशभरातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण करण्यात येणार असून प्रवाशांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, अशी माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मुंबईत दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत काल घेतलेल्या पत्रकार परिषदेत वैष्णव बोलत होते.

नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 4 हजार 819 कोटी रुपये खर्चाच्या 240 किलोमीटर लांबीच्या गोंदिया-बल्लारशहा रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाला मंजुरी दिली असल्याची माहितीही वैष्णव यांनी यावेळी दिली.

मुंबईसाठीलवकरच 238 नव्या वातानुकूलित उपनगरीय रेल्वेगाड्या आणण्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तसंच कवच 5.0 लवकरच कार्यान्वित होणार असून यामुळे रेल्वे यंत्रणेची सुरक्षा आणि कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.
मुंबईतल्या बेस्ट, उपनगरीय रेल्वे, मेट्रो इत्यादी सर्व प्रवासी सेवांचं एकाच माध्यमातून तिकिट देणारं, मुंबई वन कार्ड लवकरच सुरू होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली. याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराजांचा समृद्ध इतिहास, तसंच राज्यातल्या इतर सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळांचं दर्शन घडवणारी भारत गौरव रेल्वेगाडी येत्या 16 जुलैपासून सुरू होणार असल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली.

**वेव्हज्-वैष्णव**

वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट म्हणजेच वेव्हज् ही या क्षेत्रातली जगातली सर्वात मोठी परिषद असून, जगभरातल्या 100पेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या समवेत त्यांनी काल वेव्हज् उपक्रमाच्या तयारीचा आढावा घेतला; त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. हा कार्यक्रम दरवर्षी करण्याची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इच्छा असून तो मुंबईतच होईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

सर्जनशील क्षेत्रातून उभ्या राहणाऱ्या अर्थव्यवस्थेत महाराष्ट्र आणि मुंबईचं स्थान अतिशय महत्त्वाचं असून, बदलत्या तंत्रज्ञानाच्या या काळात हे स्थान अबाधित राखण्याच्या उद्देशानं वेव्हज् 2025चं आयोजन मुंबईत होणार असल्याचं प्रतिपादन अश्विनी वैष्णव यांनी यावेळी केलं. ते म्हणाले.....

**वेव्हज बेसिकली हम सब जनते है की, महाराष्ट्र ऑर मुंबई क्रिएटिव्ह इकोनॉमी के कॅपिटल रहे है कई 100 साल के अधिक का इतिहास है, क्रिएटिव्ह इकोनॉमी में मुंबई एक कॅपिटल रहा है | अब टेक्नोलॉजी लगातार चेंज हुई है, इस नये टेक्नोलॉजी कि युग मै मुंबई की लीडर शीप ऑर महाराष्ट्र का ये जो बहोत बडा फोकस है, वो मेंटेन रहे इस के लिये हमारे पंतप्रधान ने वेव्हज की कल्पना की है | ओडीयी व्हिडियो इंटरटेनमेंट सेक्टर मै एक टोटल नयी क्रिएटिव्ह इकोनॉमी को एक ऐसी**

**दिशा देना जो के दुनिया भर मे लोग ऑस्कर के बारेमें सोचते है | वैसे ही नई क्रिएटिव्ह इकोनॉमी को आनेवाले समय मै दुनिया भर का एक अस्पीरेशन रहेगा |**

**मुख्यमंत्री-आयआयसीटी**

आयआयटीच्या धर्तीवर इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी अर्थात आय आय सी टी ही देशातली पहिली आणि सर्वात मोठी संस्था मुंबईत उभी राहणार असून त्यासाठी गोरेगाव मधल्या चित्रनगरीत जागा दिली असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी काल दिली. मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत यासंदर्भातील सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. ही संस्था कलात्मकता आणि सर्जनशीलतेचंही मानदंड ठरणार असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून त्यांचं काल रात्री पुण्यात आगमन झालं. आज ते रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या 345 व्या पुण्यतिथी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. त्यापूर्वी रायगडाच्या पायथ्याशी पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचं ते दर्शन घेतील.

**फुले जयंती माधुरी**

भारतात स्त्री शिक्षणाचा पाया रचणारे थोर समाज सुधारक आणि क्रांतिकारक विचारवंत महात्मा जोतिराव फुले यांची जयंती काल राज्यात विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानी महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. विधान भवनातही फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. पुण्यातल्या फुले वाडा राष्ट्रीय स्मारकात काल या निमित्तानं विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालक मंत्री अजित पवार यांनी फुले वाड्यातील महात्मा फुले यांच्या स्मारकाला अभिवादन केलं. पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेन्द्र भोसले यांनी महानगरपालिकेतील महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठातही महात्मा जोतिबा फुले यांची 198 वी जयंती उत्साहात साजरी झाली. महापुरुषांचा सकारात्मक दृष्टीकोन आचरणात आणणे ही खरी क्रांती असल्याचं प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक आणि व्याख्याते प्राचार्य डॉ. प्रदीप कदम यांनी यावेळी केलं. अहिल्या नगर जिल्ह्यातही महात्मा फुले यांची जयंती विविध शाळा महाविद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. धाराशिव इथं या निमित्तानं शासकीय योजनांची माहिती देणारं प्रदर्शन आयोजित करण्यात आलं होतं.

**बुलढाणा-पुरस्कार**

यशवंत पंचायत राज अभियानात शेगाव पंचायत समितीला, अमरावती विभागातून सलग तिसऱ्यांदा तृतीय पुरस्कार मिळाला आहे. जिल्हा परिषद बुलडाणा चे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांच्या मार्गदर्शनात, ग्रामीण भागात विविध लोकोपयोगी उपक्रम राबविण्यात येत असल्याने शेगाव पंचायत समितीला हे यश मिळालं आहे. याविषयी अधिक माहिती ऐकूया खरात यांच्याकडून.....

**यशवंत राव चव्हाण पंचायत गरम अभियानात पंचायत समितीचे फार बारकावे बघितले जातात त्या मध्ये गावची लोकसंख्या साक्षरतेचे प्रमाण केलेली काम आरोग्याची परिस्थिती स्वच्छता रस्त्यांची परिस्थिती शिक्षणाचा दर्जा प्रौढ शिक्षण बद्दल आणि कार्यालयात सुद्धा तक्रारींचा निपटारा पेंडिंग प्रकरणाची निर्गती लोकशाही दिन भ्रष्टाचार निर्मुलन प्रकरणे आपले सरकार पोर्टलच्या तक्रारी त्याचे निर्मुलन अशा विविध स्वरूपाच्या गोष्टी देखील आपल्याला पूर्ण कराव्या लागतात त्याचे प्रत्येकाला मार्क्स ठरवलेले असतात, मला निश्चितपणे या गोष्टीचा आनंद आहे सलग तीन वर्ष आमच्या बुलढाणा जिल्हातील कुठली न कुठली एक पंचायत समिती या अभियानात यशस्वी पार पडते याही पुढे अशाच प्रकारे चांगल काम करण्याचा प्रयत्न करत राहणार आहोत.**

**सौरऊर्जा प्रकल्प-परभणी**

परभणी शहरातील महावितरण मंडळ कार्यालयावर उभारण्यात आलेल्या पहिल्या सौर ऊर्जा प्रकल्पाचं उद्घाटन काल, ऊर्जा मंत्री आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते झालं. राज्यातील हा पहिला सौरऊर्जा प्रकल्प असून,

जिल्ह्यातील प्रत्येक कार्यालय, घरकुल योजनेच्या घरकूलसाठी प्रस्तावित करुन, हरित ऊर्जा निर्मित केली जाणार आहे असं बोर्डीकर यांनी सांगितलं.

**राज्य महिला आयोग**

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातल्या गर्भवतीच्या मृत्यू प्रकरणी, पुणे महानगरपालिकेच्या माता मृत्यू अन्वेषण समितीचा अहवालही प्रशासनाला सादर करण्यात आल्याची माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिली. या प्रकरणात धर्मादाय सह आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील समितीनं आपला चौकशी अहवाल 8 एप्रिल रोजी विधी आणि न्याय विभागाकडे सादर केला आहे. या दोन्ही चौकशी अहवालावर राज्य शासनानं तातडीने कारवाई करावी अशी मागणी राज्य महिला आयोगाने केली आहे.

**चैत्र यात्रा-कोल्हापूर**

कोल्हापुरात, दख्खनचा राजा जोतिबा यात्रेला सुरुवात झाली आहे. हजारो भाविक आणि मानाच्या सासनकाठ्या जोतिबा डोंगरावर दाखल झाल्या आहेत. संपूर्ण यात्रेवर दोन हजार पोलिस आणि 115हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे लक्ष ठेवण्यात येत आहे.

**यात्रा-धुळे**

धुळे शहरातील आराध्य दैवत, श्री एकवीरा देवीच्या यात्रोत्सवाला काल प्रारंभ झाला. आज चैत्र पोर्णिमेला एकवीरा देवीचा रथ पांरपारीक पध्दतीनं ग्राम भ्रमतींसाठी निघेल.

**पदयात्रा-पालघर, धाराशिव**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त धाराशिव तसंच पालघर जिल्ह्यात उद्या जय भिम पदयात्रेचं आयोजन करण्यात येणार आहे. या पदयात्रेत जिल्हयातल्या विविध विद्यालयातले विद्यार्थी, एनसीसी, एन एस एस चे विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

**निधन-मुंबई**

प्रसिद्ध उद्योगपती मधुर बजाज यांचं काल पहाटे मुंबईत निधन झालं. ते 63 वर्षांचे होते. देशातल्या अग्रणी दुचाकी वाहन उद्योग बजाज ऑटोचे ते मानद संचालक होते. त्याखेरीज महाराष्ट्र स्कूटर लिमिटेडचे अध्यक्ष होते.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल कोलकाता नाईट रायडर्स संघानं चेन्नई सुपर किंग्जचा 8 गडी राखून पराभव केला. चेन्नई सुपर किंग्ज संघाचं 103 धावांचं उद्दिष्ट कोलकाता नाईट रायडर्स संघांनं 11 षटकात पूर्ण केलं.

**हवामान**

वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर राज्यात काल कोकण, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. येत्या 2 दिवसात राज्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे. दरम्यान राज्यात काल सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं 43 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.